admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१४१८/१४५२

दि. २५ जून,२०१८

## प रि प त्र क

**विषयः- व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांमधील संस्थास्तरीय कोटयातील प्रवेशाची कार्यपध्दती.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) आणि बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया दि. ११ जून २०१८ पासून सुरु झालेली आहे. या परिपत्रकाद्वारे संस्थास्तरीय कोटयातील प्रवेशाची कार्यपध्दती व वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत असून त्याप्रमाणे प्रवेश माहिती पुस्तिका अद्ययावत करण्यात येत आहे.

(१) विना अनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य, यांनी संस्थास्तरावरील प्रवेश पारदर्शक रीतीने आणि ज्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी व नंतर महाविद्यालयाकडे प्रवेशासाठी अर्ज सादर केलेला आहे अशा सर्व उमेदवारांच्या राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील गुणवत्तेनुसार करावेत;

(२) प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळेल अशा रीतीने महाविद्यालयाची माहिती व प्रवेशाचे नियम विनिर्दिष्ट केलेले असतील अशी पुस्तिका किंवा निर्देशपुस्तिका संस्थेने / महाविद्यालयाने प्रकाशित करावी. माहिती पुस्तिकेमधील सर्व माहिती संस्थेच्या / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर देखील प्रदर्शित करण्यात यावी;

(३) प्रत्येक महाविद्यालय प्रवेशाचे वेळापत्रक आणि महाविद्यालयाकडून भरावयाच्या एकूण जागांची संख्या यांची जाहिरात महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर आणि सक्षम प्राधिकारी यांच्या संकेतस्थळावर त्यांनी निश्चित केलेले शुल्क भरून अधिसूचित करतील व प्रवेश अर्ज मागवतील.

(४) संस्थेने, संस्थास्तरावर संस्थास्तरीय कोटयातील जागा व या जागांसाठी प्राप्त प्रवेश अर्जांची गुणवत्ता यादी संस्थेच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावरसुध्दा प्रसिध्द करावी.

(५) संस्थास्तरीय कोटयातील जागा (अंशतः किंवा पूर्णतः) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करण्याचा उद्देश असणाऱ्या अल्पसंख्याकेतर संस्थांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी (म्हणजेच दि. ७ जुलै,२०१८ पूर्वी) सक्षम प्राधिकाऱ्यास (मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्ष कक्ष) कळवावे. या जागांचे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमानुसार उमेदवारास प्रवेशाचे वाटप करण्यात येईल;

(६) घेतलेल्या आणि रद्द केलेल्या सर्व प्रवेशाबाबतची माहिती महाविद्यालयांनी संगणकीय (ऑनलाईन) प्रणालीमार्फत तात्काळ अद्ययावत करावी.

संस्थास्तरीय कोटयातून प्रवेशोच्छुक सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी वरील कार्यपध्दती विचारात घेऊन प्रवेश अर्ज सादर करण्याची प्रक्रिया करावी. याचबरोबर सर्व संस्था चालक / प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी उक्त कार्यपध्दती व वेळापत्रक निश्चित करून दि. २५/८/२०१८ पर्यंत अंतिमतः प्रवेशाचे वाटप केलेल्या उमेदवारांची यादी अंतिम करावी.

(रविंद्र जगताप) भा प्र से
महासंचालक

प्रतः-

१. **कुलसचिव,** महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिनस्त सर्व विद्यालये / महाविद्यालयांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून योग्य ती कार्यवाही करावी.

२. **मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि.,** तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी परिपत्रकानुसार संगणकप्रणालीमध्ये योग्य त्या सुधारणा कराव्यात तसेच सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करावे.

३. **मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट**, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

४. **मा. आयुक्त,** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांना माहितीस्तव सादर...

MCAER
कृषि परिषद

Maharashtra Council of Agricultural
Education & Research,
An ISO 9001 : 2008 Organisation
132/B, Bhamburda, Bhosale Nagar, Pune-411 007

MCAER कृषि परिषद
२००८-२००९

E-mail : ednmcaer@gmail.com
Website : www.mcaer.org
Phone : (020) 2553 7688.
Fax : (020) 2553 3764.

**No./mcaer/edn.1/ 1418 / 1452 /** **Date - 25/06/2018**

## CIRCULAR

**Subject : Admission procedure of institutional quota for professional courses in unaided private Colleges**

Admissions in professional degree courses viz. B.Sc. (Hons) Agriculture, B.Sc. (Hons) Horticulture, B.Sc. (Hons) Forestry, B. Tech. (Agricultural Engineering), B. Tech. (Food Technology), B.Sc. (Hons) Community Science and B. Tech. (Biotechnology) in four Agricultural Universities of Maharashtra started from 11th June 2018. As per this circular, the procedure for admission to institutional quota and its schedule is modified as follows and accordingly prospectus is updated.

1) Transparent admission procedure should be followed by the directors and Principals of unaided private colleges and admissions are given to the candidates as per state merit list of candidates who have submitted application form during common admission process and later on to the institute.
2) The college should publish the college information manual and admission rules well in advance before the admission process is started. The said information manual / Broachers should be published by the concern college/ institute. The same information will also be displayed on the college / institute's website.
3) Each college should receive the application form by advertising the schedule of admission procedure and information regarding total number of seats, and the said information be uploaded on the college website and competent authority's website by paying fixed fees.
4) Institute should publish their number of seats in institutional quota and merit list of application form received for the said seats on notice board and their website.

5) Except minority institute, the institutes who are willing to surrender the seats under institutional quota (Partially or fully) should inform competent authority (Hon. Commissioner, State CET Cell) before last date of submission of online admission form (i.e. before 7th July, 2018). Admission to such seats will be given to the candidates as per the central admission process.

6) The information regarding the admission and cancellation should immediately be updated through computerized online process.

All the candidates who are willing to take admission through institutional quota are hereby informed to take into consideration all above information and submit the application form. Similarly all the institute Director's / Principal's are hereby informed by this circular that they should finalize procedure and admission schedule and accordingly finalize final list of admitted candidates under institutional quota up to 25/08/2018.

**(Ravindtra Jagtap) I.A.S.**
**Director General**

**Copy to :**

1) **Hon. Commissioner**, State CET Cell, 8th Floor, New Excelsor Building, A.K. Naik Marg, Fort, Mumbai-400001 for kind information.
2) **The Registrar,** MPKV, Rahuiri, Dist. Ahemadnagar / Dr. PDKV, Akola / VNMAU, Parbhani / Dr. BSKKV, Dapoli, Dist. Ratnagiri.
   It is to inform that, the said changes may be communicated to all the colleges under your jurisdiction.
3) **M/s. Kalp Technologies Pvt. Ltd.,** 3rd Floor, Gopal House, Near Hotel Kimaya, Karve Road, Kothrud, Pune-411 029.
   It is to inform that, as per the circular computerized system may please be updated and publish this circular on website.
4) **M/s. J.D.I.N Soft**, RH-7, Plot No.67, Sector No. 16, PCNTDA, Chikhali, Pune-411 019
   It is to inform that, this circular should be uploaded on website of Agriculture Council.